**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०१/ २०१५.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १८ / ०५ /२०१५.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०१, बुधवार दिनांक २७/ ०५ /२०१५.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वससाधारण सभा **बुधवार दिनांक २७ / ०५ / २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावांची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक १ बुधवार दिनांक २७ / ०५ / २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता होणा-या
सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेच्चया हद्दीतील खंडोबा मंदिर सावेडी गावठाण ते बालिकाश्रम शाळा रस्त्याचे **'' महात्मा ज्योतिबा फुले मार्ग ''** असे नाव नामकरण होणे बाबत. (मा.सभागृह नेता श्री.कुमार बबनराव वाकळे यांचे दिनांक १८/०३/२०१५ रोजीचे पत्र) |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील सावेडी भागातील (रासनेनगर कुष्ठधाम चे पश्चिमेकडील भाग) अमोल विहार अपार्ट. कडे जाणा-या रस्त्यास **''झुलेलाल मार्ग''** असे नाव देणे बाबत. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २० मधील आडते बाजारातील गंजबाजारकडे जाणा-या चौकास **स्वातंत्र्य सैनिक दामोदर उर्फ दामुअण्णा भोरे** चौक असे नामकरण नांवर देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. १) मा.नगरसेवक श्री.शेख आरीफ रफियोद्दीन यांची दिनांक १४/०१/२०१५ ची यादी. २) मा.नगरसेवक श्री.सचिन तुकाराम जाधव यांची दिनांक १४/०१/२०१५ ची यादी. |
| ५ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १८ / ०५ /२०१५.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०१** **दिनांक : २७ / ०५ /२०१५.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** दुखवटयाचा प्रस्ताव

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते व पुरोगामी विचारवंत कामगार व श्रमिकांचे कैवारी श्री.गोविंद पानसरे यांचे सोमवार दिनांक १६/०२/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिध्द अभिनेते श्री.अजय वढावकर यांचे मंगळवार दिनांक २८/०२/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सदस्या शारदाताई भिंगारदिवे यांचे शुक्रवार दिनांक २०/०२/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | कोल्हापूर जिल्ह्याचे माजी खासदार श्री.सदाशिव मंडलिक यांचे गुरुवार दिनांक १२/०३/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | नाशिक जिल्हयाचे मनसेचे मा.आ.ॲड.श्री उत्तमराव ढिकले यांचे मंगळवार दि.७-४-२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे मा.अध्यक्ष व मा. आ.श्री विक्रमसिंह राजे घाटगे यांचे सोमवार दि. १३/४/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ७ | कोल्हापूर जिल्हयातील जेष्ठ समाजवादी व सहकारी चळवळीचे नेते माजी आ.श्री सातगोंडा रेवगोंडा उर्फ सा.रे.पाटील यांचे बुधवार दि.१५-४-२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | अहमदनगर नगरपालिकेचे मा.नगरसेवक श्री सुनिल नानेकर यांचे बुधवार दि.२२-४-२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | ओडिशा राज्याचे मुख्यमंत्री श्री जे.बी.पटनायक यांचे गुरूवार दि.२३-४-२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | नगर शहरातील सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सुशिलाबाई तिपन्ना येलुलकर यांचे शनिवार दि.९-५-२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | ग्राहक चळवळीचे प्रनेते पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.बिंदूमाधव जोशी यांचे शनिवार दिनांक ११/०५/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | प्रसिध्द साहित्यीक व इतिहासकार श्री निनाद बेडेकर यांचे शनिवार दिनांक ११/०५/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १३ | श्री.चॉदमल कचरदास भंडारी यांचे शनिवार दिनांक १६/०५/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १४ | नगर अर्बन बँकेचे मा.उपाध्यक्ष व उद्योगपती श्री मदनलालजी बरमेचा यांचे सोमवार दिनांक १८/०५/२०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

**ठराव :-**

दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २** **दिनांक : २७/०५/२०१५.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील खंडोबा मंदिर सावेडी गावठाण ते बालिकाश्रम शाळा रस्त्याचे **" महात्मा ज्योतिबा फुले मार्ग "** असे नाव नामकरण होणे बाबत. (मा.सभागृह नेता श्री.कुमार बबनराव वाकळे यांचे दिनांक १८/०३/२०१५ रोजीचे पत्र)

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.सभागृह नेता श्री.कुमार बबनराव वाकळे यांचे दिनांक १८/०३/२०१५ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार रिपोर्ट देण्यात येतो की, मा.सभागृह नेता श्री.कुमार बबनराव वाकळे यांनी दिनांक १८/०३/२०१५ रोजी यादी देऊन अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील खंडोबा मंदिर सावेडी गावठाण ते बालिकाश्रम शाळा रस्त्याचे **"महात्मा ज्योतिबा फुले मार्ग"** असे नाव नामकरण होणे बाबत कळविले आहे तसेच सदर पत्रामध्ये त्यांनी खालील प्रमाणे नमुद केलेले आहे खंडोबा मंदिर सावेडी गावठाण ते बालिकाश्रम शाळा हा उपनगरातील नागरिकांना येण्या जाण्यासाठी महत्वाचा रस्ता आहे. या परिसरात मोठया प्रमाणात कॉलनी व अपार्टमेंट झालेल्या असल्याने दाट लोकवस्ती आहे. त्यामुळे वाहतुकीची वर्दळ मोठया प्रमाणात असते.

देशाचे महान व्यक्तीमत्व, थोर समाज सुधारक, शिक्षणाच्या बाबतीत आग्रही असणारे थोर विचारवंत यांच्या नावाने आत्तापर्यंत सावेडी उपनगरात एकही रोड नाही थोर विचारवंत महात्मा ज्योतिबा फुले यांची प्रेरणा व कार्ये हे स्फुर्ती देणार आहे सदर रोडला **"महात्मा ज्योतिबा फुले मार्ग"** असे नामकरण करावे अशी मागणी सर्व नागरिकांची आहे या रोडचे असे नामकरण केल्यास महान व्यक्तीचा नगर शहराच्या तर्फे सन्मान होईल.

तरी खंडोबा मंदिर सावेडी गावठाण ते बालिकाश्रम शाळा पर्यंतच्या रस्त्यास यापुर्वी कोणतेही नाव दिलेले नसुन सदर रस्त्यास "महात्मा ज्योतिबा फुले मार्ग" असे नांव द्यावे याबाबत प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे बाबत रिपोर्ट मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता श्री.मगर यांचा अभिप्राय की, अहवाला प्रमाणे प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर करणे योग्य.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहवालाप्रमाणे विषय मे सर्वसाधारण सभेत घेणेस हरकत नाही मे.रिपोर्टान्वये आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.कैलास गिरवले :-** सभागृह उपलब्ध करुन दिल्याबद्दल मा.जिल्हाधिकारी यांचे आभार. मा.आयुक्त साहेब हेही ब-याच दिवसानंतर सभेस उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार. रस्त्याच्या बाबतीत आम्ही तक्रार केली. त्यानुसार आपण चौकशी करुन पूढील सभेत अहवाल सादर करतो असे आश्वासन दिले होते. माझ्या वाचण्यात याबाबत काही कागदपत्र आले. उपायुक्तांना आदेश देण्यात आले होते. उपायुक्त यांनी समक्ष साईटवर न जाता मला तांत्रिक दृष्टया ज्ञान नसल्याने मी अहवाल देवू

शकत नाही असा अहवाल दिला. उपायुक्त हे पाहणी समितीचे प्रमुख आहेत. त्यांनी इतरही वेळी पाहणीसाठी गेल्याचे सांगीतले जाते. त्यांना या गोष्टीचे ज्ञान असेल असेच काम देण्यात यावे. याबाबत आम्हाला माहिती देण्यात यावी. तसेच दैनिक सकाळ मध्ये VRS ची बातमी आली आहे. आपण स्वेच्छा निवृत्ती देत नसल्याने अशा गोष्टी घडत आहे. नगर शहरातील योजना या अकायक्षमतेमुळे मागे पडल्या आहेत. फेज-२ तसेच रस्त्यांच्या बाबत कामे पूर्ण होत नाही. VRS देण्यात याव्यात. रिलायन्स केबल रस्ता खोदाई करीताच्या अहवालाबाबत दिलेल्या आश्वासना बाबत माहिती देण्यात यावी. VRS बाबतही माहिती द्यावी त्यांना जर काम करण्याची इच्छा नसेल तर त्यांना जावू देण्यात यावे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** पाहणी समिती अहवाल काढून टाकण्यात यावा. कायद्यामध्ये याबाबत कुठलिही तरतूद नाही. प्रभाग अधिकारी याचा या कामाशी काय संबंध आहे. प्रोसीजर अशी फोलोअप केली पाहीजे. टेक्नीकल व्यक्तीशी पाहणी अहवाल संबंधित असावा व्यवस्थीत विचार विनीमय करुन निर्णय घ्या ही प्रथा पाडलेली आहे. नगरपालिका असतांनाही ही पध्दत नव्हती मनपा असताना वेगळी पध्दत पाडण्यात आलेली आहे ही पध्दत बंद करा. ज्या माणसाचा संबंध नाही अशांना वगळण्यात यावे प्रभाग अधिका-यांना यातुन वगळण्यात यावे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कामाच्या संदर्भात जे आगरकर साहेब यांनी सांगीतले ते बरोबर आहे. फक्त सिटी इंजिनियर ठेवण्यात यावे. पुढे यायची आवश्यकता नाही. अभियंता व सिटी इंजि. यांच्याच प्रस्तावावर सह्या घेण्यात याव्या फाईलचा अगदी चुकीचा प्रवास आहे. बालिकाश्रम रस्त्यासाठी PMC नेमली रस्त्याची आज काय अवस्था आहे. ज्या पध्दतीने टेंडर मध्ये रस्ता दाखविला खरोखर त्या पध्दतीचा रस्ता होतो का नाही. हे पाहण्याची सिटी इंजि.यांची जबाबदारी आहे.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी :-** आजच नगरसचिव विभागाकडे तिनही विषयांचे अहवाल पाठविले. पूढील सभेत त्यावर चर्चा होईल. स्टाफींग पॅटर्न मंजुरीसाठी बराच कालावधी गेला या आठवडया भरात स्टाफींग पॅटर्न मंजूर होईल. इंजि.कमतरता दूर होईल. मानधनावर इंजिनियर साठी ही जाहीरात देण्यांत आली होती परंतू मुलाखती नाही उमेदवार आले नाहीत. प्रभाग अधिकारी यांच्या बाबत विचार घेवून निर्णय घेण्यात येईल. उपायुक्त व अति.आयुक्त स्तरावर बीले तपासूनच अदा करावी लागतील ५ लाखापर्यंतचे प्रस्ताव मंजूरीचे अधिकार मी प्रदान केले आहेत. तांत्रिक बाबी बद्दल सिटी इंजिनियर यांची जबाबदारी आहे. प्रशासकीय मंजुरी इतर बाबी उपायुक्तांनी पाहणे गरजेचे आहे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** प्रशासकीय मंजुरी हा तुमचा भाग झाला एखाद्या कामा बाबत तक्रार केली तर आम्हाला तुम्हाला पाचारण करावे लागते. टेक्नीकल मनुष्य लक्ष देत नाही म्हणुनच तुम्हाला बोलवावे लागते. थोडाफार अनुभवाचा विषय आहे.अनुभवाच्या जोरावर आपण पहावे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** सेकंड फेज विषयी बोलायचे आहे. अतिशय महत्वाची योजना आहे मी एक पत्र दिले होते. चारठाणकर साहेबांनी मला उत्तर त्याबाबत दिले ते मला अपेक्षीत नव्हते मी ते वाचून दाखवतो. ठेकेदाराकडे अनूभव नसलेले कर्मचारी असले बाबत पत्रात उल्लेख आहे मग त्याचवेळी आपण निर्णय का घेतला नाही. मी मागेच सांगीतले कुठली तरी एक साईट पूर्ण करा. आपण फक्त पत्र देतो PMC आपल्याकडे कामाला आहे. PMC च्यावर आपण आहात PMC काम व्यवस्थीत करते की नाही हे पाहण्याची जबाबदारी आपल्या इजिनियर यांची आहे. सेकंड फेज विषयी माहिती द्या.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी :-** फेज टूच्या कामाबाबत वेळोवेळी मा.महापौर व माझ्या स्तरावर बैठकी घेण्यात आल्या आहेत. ३१ मार्चला एजन्सीने काम बंद केले. नविन एजन्सी नेमून काम करणे शक्य नाही वेळोवेळी काम सुरु करण्यासाठी मा.महापौर यांनी मार्ग काढला व काम चालू करण्यास सांगीतले. खुप प्रयत्न केले व डिस्ट्रीब्युशनच्या अडचणी आहे. टाक्या कशा भरतील हे काम प्रथम प्राधान्याने करावयास सांगीतले. टप्प्या टप्याने पाईप लाईन जोडणीचे काम होणार आहे. महिनाभर काम बंद पडते. वेळोवेळी मा.महापौर स्तरावर बैठका घेण्यात आल्या आहेत. टाक्या भरल्याशिवाय कुठलाही भाग सुरु करु शकत नाही. विळद येथील ६ महिन्यात काम संपायला पाहिजे फेज वाईज Time bond आढावा घेण्याचे ठरले आहे. वेळोवेळी सभागृहाला माहिती देण्यात येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** केडगांव देवीच्या रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत आहे तेथील शेतक-यांचा टीडीआर चा प्रश्न मार्गी लावावा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आमच्या बजेटवर काम होत नाही. वॉर्डात काम होत नाही. नागरी सुविधेची कामे होणार की नाही. या संदर्भात काय आहे ठेकेदार काम करत नाही. बील निघत नाही. छोटी मोठी कामे झाली पाहिजे नगरसेवक निधीतील काम केल्याशिवाय दुसरे काम करु नये असे काहीतरी बंधन घाला. प्रभाग समितीला बजेट दिलेले नाही त्यांना अधिकार देत नाही. मा.महापौर एखाद्या शासकीय निधी सोबत एखादे काम द्यायचे हे इथे बोलायचा विषय नाही. बजेटची कामे झाली नाहीतर प्रशासनाने याची जबाबदारी घ्यावी.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** चव्हाण साहेब यांनी जी सूचना केली ती अत्यंत योग्य आहे. नगरसेवक निधीची फक्त तरतूद करतो देयक अदा करायची जर हमी घेतली तरच ठेकेदार कामे करतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** केडगांव रस्त्या बाबत ३ लोक कोर्टात गेले TDR न दिल्याने ते काम थांबले आहे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** मौजे सावेडी गट क्र.२४७९ विद्युत उपकेंद्र उभारणीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावा याबाबत मी पत्र दिले वारंवार लाईटची टंचाई निर्माण होते याबाबत आम्ही दिलेल्या पत्राला उत्तर दिले नाही. जागा देता येते की नाही शहराला सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केला पाहीजे दीड दोन वर्ष झाले पैसे येवून झालेले आहे.

**मा.महापौर साहेब :-** त्यांना आम्ही जागा दाखवल्यादोन्ही पैकी एक जागा दाखवा असे सांगीतले.जागेबाबत मी समक्ष मिटींग घेतली पत्र त्यांनी उशीरा दिले असल्याने उशीर झाला. पुढच्या सभेत विषय घेण्यात येईल.

बालिकाश्रम रस्त्यास नाव देणे ऑफिस रिपोर्ट वाचन करण्यात आले.

**मा.सौ.मालन ढोणे :-** गरगडे यांचे नाव देण्याबाबत आम्ही यादी दिली पण या सभेत विषय घेण्यात आला नाही.

**मा.महापौर साहेब :-** प्रस्तावानुसार कार्यवाही करावी.

**मा.श्री.गणेश भोसले :-** नाव कोणाच द्यायच कुणी द्यायच हे व्यवस्थीत ठरवा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** विषय पत्रिकेवरील सर्व विषय मंजूर करण्यांत यावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** विषय पत्रिकेवरील सर्व विषय मंजूर करण्यांत यावे.

**मा.महापौर साहेब :-** विषय पत्रिकेवरील तिनही विषयांची चर्चा पूर्ण झाली असून ते मंजूर करण्यात आले आहेत. इतरही विषयाचा समावेश करण्यात आला आहे. सर्व विषयास मंजूरी देण्यात येत आहे. ढोणे मॅडम, छिंदम यांनी ज्या याद्या देउन त्यावर प्रस्ताव नगरसचिव कार्यालयास प्राप्त आहेत त्याचाही यात समावेश करण्यांत यावा.त्या प्रस्तावांना तसेच या सभेमध्ये ज्या याद्या देण्यात आल्या आहेत त्या प्रस्तावांना देखील मंजूरी देण्यात येत आहे. तसेच मी महासभे समोर मांडत आहे की, व्यक्तीगत कारणामुळे मी महापौर पदावर काम करु इच्छीत नाही. त्यामुळे मी महापौर पदाचा राजीनामा मा.आयुक्त यांचेकडेस देत आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आपण सर्वांना बरोबर घेवून काम केल्याने नगरकरांनी विकासाच्या मुद्यावर आपणाला विधानसभेसाठी निवडून दिले. ५ रस्त्यांची कामे मार्गी लावले. फेज-२ चे काम ठेकेदार बंद करणार होता ते काम आपण मार्गी लावले. नगरसेवक म्हणून आपण प्रतिनिधीत्व करणार आहेत. आपले सहकार्याने जो कोणी महापौर होईल त्याला मार्गदर्शन राहीलच शहराच्या विकासासाठी आम्ही आपल्या बरोबर राहू.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** गेल्या ब-याच दिवसात वृत्तपत्रातून राजीनाम्याच्या बातम्या येत होत्या. सेवा करण्याच्या दृष्टीने जी जी पदे मिळाले त्या पदावर चांगली कामे केली आहेत. सर्व जनतेचे प्रतिनिधी म्हणून काम करीत होते. दोन्ही महत्वाचे पदे त्यांचेकडे होती आता त्यांची जबाबदारी वाढलेली आहे. पूर्ण शहराचे प्रतिनिधीत्व म्हणून काम करत आहेत. शासनाकडे येणारे वेळोवेळी निधी संदर्भात येणा-या अडचणी ते या सभागृहातील प्रश्न शासनाकडे विधान सभेत प्रश्न उपस्थित करतील आवाज उठवतील नागरिकांची  वचनपुर्ती ते पूर्ण करतील. नागरिकांचे प्रश्न सुटायला पाहीजे नाशिकच्या बरोबर शहर दिसायला पाहीजे तुमच्या भावी कारकिर्दीला शुभेच्छा देवून भाषण संपवतो.

**मा.श्रीमती.नसिम शेख सभापती मबाक :-** आम्ही नविन नगरसेवक आहोत आम्हाला चांगल्या पध्दतीने मार्गदर्शन केले वयाच्या ३० व्या वर्षी उंच भरारी घेतली सर्व नगरवासियांतर्फे खूप शुभेच्छा शासनाकडून आपण नविन योजना आणणार आहात.

**मा.श्री.नजीर अहमद शेख :-** इतक्या कमी वयात महापौर यांनी जे काम केले ते कोणी केले नाही. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. राजीनामा दिल्याबद्दल वाईट वाटते.

**मा.श्री.कुमार वाकळे सभागृह नेता :-** आपल्या कार्यकाळामध्ये जो अनुभव मला आलो तो चांगला आहे. कॉलेज वयात आपला सहवास लाभला शाखा प्रमुखा  पासुन सुरुवात झाली. आमच्या मनाला खूप वाईट वाटते.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** अपक्ष मित्रांना सांभाळून घेतले मा.महापौर यांच्या काळात बरीच कामे झाली दोन्ही मित्रांच्या वतीने आभार मानतो जस संग्राम भैय्यांनी काम केल तसेच निवडुण येणा-या नविन महापौरांनी काम कराव एवढ बोलून दोन शब्द संपवतो.

**मा.श्री.अभय आगरकर :-** या शहरामध्ये आपण महापौर पद स्विकारल्यानंतर महापौर हा सर्व शहराचा असतो या सभागृहात आल्यानंतर महापौर अध्यक्ष म्हणून विराजमान होत असतो. सभागृहामध्ये काम करत असतांना अनेक गोष्टी कामाच्या रुपाने पुढे येत असतात. काही काम यशस्वी होतात काही अयशस्वी होतात काही भ्रष्टाचारात अडकतात जे जे राजकीय प्रवास करतात त्यांच्या आयुष्यात या गोष्टी घडत असतात. नागरी सुविधा देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्नशील असणे गरजेचे

आहे. अशी प्रामाणिक इच्छा असताना नागरी सुविधा भेटण्यासाठी प्रयत्नशील असणं गरजेचे असते. कार्यबाहुल्यामुळे आपण महापौर पद सांभाळू शकत नाही असे निवेदन आपण केले पण गेल्या ६ महिन्यापासून आपण महापौर व आमदार कार्यभार सांभाळत होतातच. राजीनामा देण्याची आवश्यकता नव्हती. आपण आज राजीनामा दिला पुढील राजकीय प्रवासास आपणास भाजपा व शिवसेने तर्फे शुभेच्छा देतो.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** राजकारणामध्ये शब्द दिला जातो पण तो पाळला जात नाही. असे प्रमाण आहे. शब्द दिला व तो पाळला असे क्वचित घडले. मी यापुर्वीही सभेत बोललो आहे. एवढया कमी वयात ही संधी तुम्हाला आलेली आहे. हे मी आपणाला यापूर्वी सांगीतले बार्शीकरा नंतर हा मान आपणास मिळाला आहे. आपले निश्चीतच कौतुक करतो. निश्चीतच सभागृहात काम करतांना आपण दुखावला असाल त्याबद्दल मी माफी मागतो. जरी आपण त्या पदावर नसला तरी सर्वांच्या सहकार्याने जो नविन महापौर होईल त्याला आमचा पाठींबा राहिलच.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील खंडोबा मंदिर सावेडी गावठाण ते बालिकाश्रम शाळा रस्त्याचे **''महात्मा ज्योतिबा फुले मार्ग''** नाव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच नामकरणाचे फलकाचे खर्चास ही मान्यता देण्यात येत आहे.

तसेच आज रोजी सभेमध्ये श्री.कुमार बबनराव वाकळे, सभागृह नेता यांच्या यादीनुसार व जिवा सेना, अहमदनगर या संस्थेच्या पत्रानुसार प्रेमदान हॉटेल चौकास **''जिवबा तथा जिवा महाले चौक''** असे नाव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तथापि याबाबतचे कार्यालयीन सोपस्कार पूर्ण करुन योग्य ती पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच नामकरणाचे फलकाचे खर्चास ही मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मा.पिठासीन अधिकारी यांनी आदेशीत केल्याप्रमाणे नगरसचिव कार्यालयाकडे १) नगरसेवक श्री.श्रीपाद शंकरराव छिंदम, २) नगरसेविका सौ.मालनताई सुरेश ढोणे, यांची यादी व ३) इंडियन मेडिकल असोसिएशन यांचे दिनांक ०३/०२/२०१५ रोजीच्या पत्रानुसार बांधकाम विभागाच्या प्रस्तावानुसार प्रभाग क्रमांक १७ मधील तोफखाना सोळा तोटी कारंजा या चौकास **''स्व.डॉ.शाम गरगडे चौक''** नाव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच नामकरणाचे फलकाचे खर्चास ही मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबन वाकळे,

अनुमोदक - मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ३** **दिनांक : २७/०५/२०१५.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील सावेडी भागातील (रासने नगर कुष्ठधाम चे पश्चिमेकडील भाग) अमोल विहार अपार्ट.कडे जाणा-या रस्त्यास **''झुलेलाल मार्ग''** असे नाव देणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : श्री.सुंदर अहुजा यांचे मा.महापौर तथा आमदार साहेब यांना दिनांक ३१/१२/२०१४ रोजी दिलेले निवेदन.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार रिपोर्ट देण्यात येतो की, श्री.सुंदर अहुजा व सदर भागातील नागरिक यांनी मा.महापौर तथा आमदार साहेब यांना दिनांक ३१/१२/२०१४ रोजी निवेदन देऊन सावेडी भागातील (रासनेनगर कुष्ठधाम चे पश्चिमेकडील भाग) अमोल विहार अपार्ट. कडे जाणा-या रस्त्यास **''झुलेलाल मार्ग''** असे नाव देणे बाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार सदर पत्रामध्ये त्यांनी खालील प्रमाणे नमुद केलेले आहे. सावेडी भागातील (रासनेनगर कुष्ठधाम चे पश्चिमेकडील भाग) अमोल विहार अपार्ट. कडे जाणा-या रस्त्या लगत प्रसिध्द चित्रकर्ती अनुराधा ठाकुर यांच्या घरासमोरुन अमोल विहार अपार्ट.कडे जाणा-या मार्गावर बहुतेक सिंधी समाजाची घरे आहेत. तसेच सिंधी समाजाचे कुलदैवत व अवतार श्री.झुलेलाल उत्सव मोठया श्रध्देने साजरा केला जातो. तसेच समाजाच्या भावनांची दखल घेऊ न सदर रस्त्याचे झुलेलाल मार्ग असे नामकरण करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

तरी इकडील रजिष्टर पहाता सावेडी भागातील (रासनेनगर कुष्ठधाम चे पश्चिमेकडील भाग) अमोल विहार अपार्ट कडे जाणा-या रस्त्यास यापुर्वी नामकरण झालेले नसुन **''झुलेलाल मार्ग''** असे नांव द्यावे याबाबत प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे बाबत रिपोर्ट मान्यतेस्तव तथा निर्णयास्तव सविनय सादर.

यावर शहर अभियंता श्री.मगर यांचा अभिप्राय की, अ अहवालाप्रमाणे मान्यतेस तथा आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ नुसार विषय महासभेत घेणे बाबत आदेशार्थ स सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

चर्चा नाही.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील सावेडी भागाती (रासने नगर कुष्ठधाम चे पश्चिमेकडील भाग) अमोल विहार अपार्ट.कडे जाणा-या रस्त्यास **''झुलेलाल मार्ग''**

असे नाव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच नामकरणाचे फलकाचे खर्चास ही मान्यता देण्यात येत आहे.

तसेच आज रोजी सभेमध्ये मा.सदस्य श्री.किशोर डागवाले, यांच्या यादीनुसार प्रभाग क्रमांक २१ मधील धनगर गल्ली येथील महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मधील बगीच्यास थोर स्वातंत्र्य सेनानी **"कै.एकनाथ रामचंद्र शिंदे"** असे नाव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तथापि याबाबतचे कार्यालयीन सोपस्कार पूर्ण करुन योग्य ती पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच नामकरणाचे फलकाचे खर्चास ही मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबन वाकळे,

अनुमोदक - मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ४** **दिनांक : २७/०५/२०१५.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २० मधील आडते बाजारातील गंजबाजारकडे जाणा-या चौकास **स्वातंत्र्य सैनिक दामोदर उर्फ दामुअण्णा भोरे** चौक असे नामकरण नांव देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. १) मा.नगरसेवक श्री.शेख आरीफ रफियोद्दीन यांची दिनांक १४/०१/२०१५ ची यादी. २) मा.नगरसेवक श्री.सचिन तुकाराम जाधव यांची दिनांक १४/०१/२०१५ ची यादी.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.नगरसेवक श्री.शेख अरिफ रफियोद्दीन यांची दिनांक १४/०१/२०१५ ची यादी.

२) मा.नगरसेवक श्री.सचिन तुकाराम जाधव यांची दिनांक १४/०१/२०१५ ची यादी.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, प्रभाग क्रमांक २० मधील आडते बाजारातील गंज बाजारकडे जाणा-या चौकास **स्वातंत्र्य सैनिक दामोदर उर्फ दामुअण्णा भोरे** असे नामकरण नांव देणे बाबत मा.नगरसेवक श्री.शेख आरिफ रफियोद्दिन व मा.नगरसेवक श्री.सचिन तुकाराम जाधव यांची दिनांक १४/०१/२०१५ यादी देवुन सदर चौकास नांव देणे बाबत सुचविले आहे. स्वातंत्र्य सैनिक दामोदर उर्फ दामुअण्णा भोरे अहमदनगर शहरातील प्रसिध्द व्यापारी होते. त्यांनी ब्रिटीशांच्या विरुध्द झालेल्या लढाईत त्यांनी वयाच्या १९ व्या वर्षी सन १९३२ साली व २९ व्या वर्षी सन १९४२ साली येरवडा येथे तुरुंगवास व दंडाची शिक्षा भोगलेली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मा.श्री.वसंतराव नाईक मुख्यमंत्री असतांना त्यांना महाराष्ट्र शासनाचे सन्मानपत्र देवुन स्वातंत्र्य सैनिक म्हणुन गौरविण्यात आलेले आहे. व दिनांक १९ ऑगष्ट १९७२ साली तत्कालीन पंतप्रधान श्रीमती.इंदिरा गांधी यांनी ताम्रपत्र देवुन दिल्ली येथे त्यांचा गौरव केलेला आहे.

तरी प्रभाग क्रमांक २० मधील आडते बाजारातील गंज बाजारकडे जाणा-या चौकास **स्वातंत्र्य सैनिक दामोदर उर्फ दामुअण्णा भोरे** असे नामकरण केल्यास त्यांच्या आठवणी नागरिकांना स्मरणात राहतील या उद्देशाने या चौकास नाव देण्यात यावे असे संदर्भीय पत्रान्वये मा.नगरसेवक श्री.शेख अरिफ रफियोद्दीन व मा.नगरसेवक श्री.सचिन तुकाराम जाधव यांनी कळविले आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस असल्याने आडते बाजारातील गंज बाजारकडे जाणा-या चौकास **स्वातंत्र्य सैनिक दामोदर उर्फ दामुअण्णा भोरे** चौक असे नांव देणे बाबत प्रस्ताव मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर शहर अभियंता श्री.मगर यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर करणे योग्य.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित केलेनूसार अ प्रमाणे प्रस्ताव मे.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणेस हरकत नाही. मे.आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

चर्चा नाही.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २० मधील आडते बाजारातील गंजबाजारकडे जाणा-या चौकास **स्वातंत्र्य सैनिक दामोदर उर्फ दामुअण्णा भोरे** चौक नाव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच नामकरणाचे फलकाचे खर्चास ही मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मा.पिठासीन अधिकारी यांनी आदेशीत केल्याप्रमाणे नगरसचिव कार्यालयाकडे मा.सदस्य श्री.मनोज लक्ष्मण दुलम, यांचे पत्रानुसार, बांधकाम विभागाच्या प्रस्तावानुसार गांधी मैदान येथील मार्कंडेय मंदिराजवळील चौकास **''श्री. मार्कंडेय महामुनी चौक ''** नाव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच नामकरणाचे फलकाचे खर्चास ही मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबन वाकळे,

अनुमोदक - मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.